दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३९९ वा • सोमवार, ता. ८ सप्टेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## दिगंबर कामत यांच्या वक्तव्याने भाजपची फरपट

### सोशल मिडीयाचा फटका



**पणजी । रयत समाचार**

भाजप प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांच्या वाढदिवस कार्यक्रमात बांधकाममंत्री दिगंबर कामत यांनी केलेल्या गजब भाषणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान वायरल झाला. गोव्यात पुढील पंधरा वर्षे भाजप सत्तेवर येऊ नये, अशा पद्धतीचे वातावरण दामू यांनी निर्माण करावे, असे कामत चुकून बोलून गेले. दामूंना शुभेच्छा देण्यासाठी शनिवारी रात्री फातोर्डा-मडगाव येथे कार्यक्रम होता. यावेळी मुख्यमंत्री प्रमोद सावंत, जलस्रोतमंत्री सुभाष शिरोडकर, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी दिगंबर यांनी आपल्या नेहमीच्या स्टाइलमध्ये आवेशपूर्ण भाषण केले. यावेळी दिगंबर म्हणाले, अलीकडेच आचार्य प्रमोद कृष्णम यांच्याकडून एक विधान आले आहे की, भाजप पुढील वीस वर्षे देशात सत्तेवर येऊ शकणार नाही. गोव्यातही पुढील पंधरा वर्षे भाजप सत्तेवर येऊ नये अशा पद्धतीचे वातावरण दामू यांनी निर्माण करावे. यावेळी तेथे कोणीही हस्तक्षेप केला नाही. उलट दिगंबर यांचे भाषण संपल्यावर जोरदार टाळ्या वाजवल्या, या भाषणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर जेंव्हा व्हायरल झाल्या तेंव्हा अनेक परखड कॉमेंट्स येवू लागल्या. विरोधकांनी जोरदार टीकाटीप्पणी केली आहे. देवाचा माणूस मंत्रिपद मिळाल्यानंतर हे कसे काय बोलला? अशी विचारणा करून खिल्लीही उडवली. कामत यांचे विरोधक प्रभवनायक यांनी सोशल मीडियावर कामत यांना पार्टी विथ डिफरन्स असलेल्या पक्षात तीव्र नाराजी जाणवू लागली आहे. म्हणूनच ते प्रदेशाध्यक्षांना भारतात २० वर्षे आणि गोव्यात १५ वर्षे भाजप सत्तेत येणार नाही, अशी परिस्थिती निर्माण करा असे आवाहन करतात. कामत यांना वातावरण कळले असावे, म्हणून त्यांनी हे विधान केले असावे असा टोला लगावला आहे.



## आणिक डेपो-वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया मेट्रो-११ प्रकल्पाला मंजुरी

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

मुंबईत आणखी एक महत्त्वाचा मेट्रो प्रकल्प मार्गी लागला आहे. आणिक डेपो-वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया अशी असणाऱ्या मेट्रो-११ मार्गिकेला अखेर मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पासाठी तब्बल २३ हजार ४८७ कोटी रुपयांचा खर्च मंजूर करण्यात आला आहे. सुमारे १७.५१ किमी लांबीच्या या मार्गिकेतील तब्बल ७० टक्के भाग हा भुयारी असणार आहे. एकूण १४ स्थानकांपैकी १३ स्थानके भूमिगत तर एक स्थानक भू-समतल असेल. मेट्रो-११ वडाळा येथील आणिक डेपोपासून सुरू होऊन गेटवे ऑफ इंडिया येथे संपणार आहे. स्थानकांमध्ये आणिक आगार, वडाळा आगार, सीजीएस वसाहत, गणेश नगर, बीपीटी रुग्णालय, शिवडी, हे बंदर, दारुखाना, भायखळा, नागपाडा जंक्शन, भेंडी बाजार, सीएसएमटी, हॉर्निमन सर्कल आणि गेटवे ऑफ इंडिया यांचा समावेश आहे. ही मार्गिका पुढे वडाळा येथे मेट्रो-४ मार्गिकेला जोडली जाणार आहे. त्यामुळे ठाणे ते गेटवे ऑफ इंडिया असा एकाच मेट्रोने प्रवास करणे शक्य होणार आहे. मात्र प्रवाशांना वडाळा येथे मेट्रो बदलावी लागणार आहे. सध्या मेट्रो-४ च्या कामाला वेग आला असून या वर्षाअखेर त्याचा पहिला टप्पा सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तर संपूर्ण मार्गिका २०२७ पर्यंत कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. मेट्रो-११ ची उभारणी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (MMRC) करणार असून येत्या काही महिन्यांत निविदा प्रक्रिया सुरू होणार आहे. या मार्गिकेच्या उभारणीमुळे दक्षिण मुंबई ते ठाणे असा मेट्रो प्रवास अधिक सुलभ आणि वेगवान होणार आहे.



## श्रीबलराम विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

**काणकोण । रयत समाचार**

श्री बलराम प्राथमिक अवे शाळेत शिक्षक दिन मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. या दिवशी इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका स्वीकारून सहाध्यायांना शिकवण्याचा वेगळा अनुभव घेतला. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक चंद्रकांत वेळीप यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट करणारी भाषणे सादर केली.

विशेषत: चौथीच्या विद्यार्थ्यांनी वर्ग शिकवताना आलेला प्रत्यक्ष अनुभव उत्स्फूर्तपणे मांडला. मुख्याध्यापकांनी आपल्या मार्गदर्शनातून मुलांना शिक्षक दिनाचे महत्त्व पटवून सांगितले. तसेच प्रत्येकासाठी आयुष्यातील पहिला शिक्षक म्हणजे आईवडील असून त्यांचा सन्मान करणे आवश्यक असल्याचे अधोरेखित केले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी विविध खेळ व स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या शिक्षकांना विद्यार्थ्यांकडून बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत ''गुरुचरणी अर्पण केलेले हे जीवन'' हा संदेश अधोरेखित केला.

# करा जाहीर, कोट्यवधींचा खर्च कुणाचा-आमदार रोहित पवार

### निनावी जाहिरातींवरून पवारांचा बावनकुळेंवर हल्लाबोल

**मुंबई । रयत समाचार**

कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी रा.स्व संघ भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर देवाभाऊंच्या निनावी जाहिरातींविषयी थेट सवाल उपस्थित केला. ''तुम्ही रोज ४० कोटी नाही तर ४०० किंवा ४००० कोटींच्या जाहिराती द्या, आमचा आक्षेप नाही. पण या जाहिराती निनावी का छापल्या गेल्या, याबाबत आमचा ठाम आक्षेप आहे,'' असे आमदार पवार म्हणाले.आमदार पवारांनी पुढे भाष्य करताना सांगितले, निनावी जाहिरात म्हणजे उपकाराची परतफेड असते हे तुम्हाला चांगले ठाऊक असेल. जर या जाहिराती सरकारने दिल्या असतील, तर एका बाजूला योजना बंद करून, कंत्राटदारांची बिले प्रलंबित ठेवून, त्यातून आत्महत्या होण्याची वेळ येते आणि दुसरीकडे कोट्यवधींचा जाहिरातींवर खर्च होतो, हे जनतेच्या पैशाची उधळपट्टी नाही का? असा थेट प्रश्न त्यांनी केला. भाजपच्या नावाने जाहिरात न देण्यावरूनही रोहित पवारांनी शंका उपस्थित केली. ''जर या जाहिराती भाजपने दिल्या असतील, तर त्या स्पष्टपणे भाजपच्या नावाने का दिल्या नाहीत? आणि जर भाजपने दिल्या नाहीत, तर कुठल्या कंपनीने की मग मित्रपक्षातील अडचणीत सापडलेल्या नेत्याने उपकाराची परतफेड म्हणून या कोट्यवधी रुपयांच्या जाहिराती दिल्या?'' अशी शंका त्यांनी उपस्थित केली. याच संदर्भात महसूलमंत्री असताना बावनकुळे यांनी ९० कोटी रुपयांपेक्षा अधिक दंड माफ केलेल्या कंपनीवर पवारांनी टोलाही लगावला. ''काय त्या कंपनीनेच या जाहिराती दिल्या काय?'' असा प्रश्न त्यांनी विचारला. शेवटी, या संपूर्ण प्रकरणावर स्पष्ट भूमिका घेण्याची मागणी करताना रोहित पवार म्हणाले, या जाहिरातींमध्ये काहीही काळेबेरं नसेल, लपवण्यासारखं नसेल, तर एवढे कोट्यवधी रुपये उधळून जाहिराती कुणी दिल्या हे तुम्ही जाहीर का करत नाही? करा जाहीर! देवाभाऊंच्या निनावी जाहिरात प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात नव्याने चर्चा रंगू लागली आहे.





## गिरगाव चौपाटीवरील विसर्जन सोहळ्याला रामदास आठवलेंसह मुख्यमंत्र्यांची भेट

**मुंबई । प्रतिनिधी**

गिरगाव चौपाटीवर गणेश विसर्जनाचा भव्य सोहळा अनुभवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट देत 'श्रीं'ची आरती केली. बृहन्मुंबई महानगरपालिका आणि राज्याच्या पर्यटन विभागाने संयुक्तपणे उभारलेल्या दालनात त्यांनी पर्यटकांसह गणरायाचे दर्शन घेतले.

मॉरिशस, कोरिया, अमेरिका, थायलंड, जपान आणि दक्षिण आफ्रिका येथून आलेल्या पर्यटकांनी पारंपरिक महाराष्ट्रीय पोशाख परिधान करून विसर्जन मिरवणुकीत सहभाग घेतला. ढोल-ताशांच्या गजरात, शंखनाद आणि भक्तिमय वातावरणात त्यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा मनसोक्त आनंद लुटला. विसर्जनाच्या या अद्वितीय सोहळ्याने पर्यटक थक्क झाले. ''गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे. परदेशी पर्यटकांना या उत्सवात सहभागी करून घेणे, हा आपल्या परंपरांचा जागतिक स्तरावर प्रसार करण्याचा एक सशक्त प्रयत्न आहे.

यामुळे महाराष्ट्राच्या पर्यटनाला नवी दिशा मिळेल आणि आपल्या वारशाची ख्याती जगभरात पोहोचेल,'' असा विश्वास पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी व्यक्त केला. गिरगाव चौपाटीवरील हा विसर्जन सोहळा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे जागतिक दालन ठरत असून, 'गणेशोत्सव जागतिक पातळीवर महाराष्ट्राच्या ओळखीचा ठसा उमटवतोय', अशी प्रतिक्रिया उपस्थित पर्यटकांनी दिली.



## नाथ पै चौक मंडळाने लोकमान्यांना अभिप्रेत उत्सव साजरा केला- नंदीहळी

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

अलीकडच्या काही वर्षांत गणेशोत्सव म्हणजे डॉल्बी असे समीकरण तयार झालेले दिसते. उत्सवातून प्रबोधनात्मक आणि विधायक कार्य घडणे गरजेचे आहे, मात्र ते कमी प्रमाणात दिसते. परंतु बॅरिस्टर नाथ पै चौक मंडळाने लोकमान्य टिळकांना अभिप्रेत असा गणेशोत्सव साजरा केला आहे, असे प्रतिपादन विश्व भारत सेवा समितीचे कार्यकारी प्रकाश नंदीहळी यांनी केले.

बॅरिस्टर नाथ पै चौक गणेशोत्सव मंडळ यावर्षी सुवर्ण महोत्सव साजरा करत आहे. या निमित्ताने अनेक सामाजिक, सांस्कृतिक व समाजप्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात आले आहेत. त्याचाच भाग म्हणून शुक्रवारी सकाळी महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी महापालिकेचे शहापूर विभाग आरोग्य निरीक्षक हनुमंत पाटील, नुकतेच सेवेतून निवृत्त झालेले श्याम चौगुले तसेच शहापूर पोलीस ठाण्याचे एएसआय धनकवडे यांचा मंडळाचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील, उपाध्यक्ष सचिन रंगरेज, परशुराम घडी, प्रदीप मुजुकर, लक्ष्मण छत्रण्णावर, हिरालाल चव्हाण, यल्लाप्पा बसरीकट्टी आदी पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याशिवाय ५ सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधून मंडळाच्या वतीने प्रकाश नंदीहळी, शेखर करंबळकर, दीपक धामणेकर, किरण कदम, एम. एन. पाटील, एम. बी. बाचीकर, वासुदेव कदम, शंकर चव्हाण यांसह अनेक शिक्षकांचा शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. सन्मानित शिक्षकांनी सुवर्ण महोत्सवी वर्षात मंडळाने राबविलेल्या विधायक उपक्रमांचे कौतुक केले. तसेच मंडळाने बेळगावातील इतर मंडळांसमोर कार्याचा आदर्श निर्माण केला असल्याचे त्यांनी मनोगत व्यक्त केले.

## महिला भगिनींची स्वराज टूर अॅण्ड ट्रॅव्हल्सची देवदर्शन सहल

**कर्जत । प्रतिनिधी**



अखंड हरीनाम सप्ताहाच्या पावन पर्वानिमित्त कोळवडी गावात दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य धार्मिक उपक्रम राबविण्यात आला. राहुल तात्यासाहेब नवले यांच्या मार्गदर्शनाखाली स्वराज टूर ट्रॅव्हल्स २०२५ या सहलींच्या दुसऱ्या वर्षात गावातील महिला भगिनींसाठी लकी ड्रॉच्या माध्यमातून विशेष देवदर्शन ट्रिपचे आयोजन करण्यात आले. सप्ताहातील आठ किर्तन कार्यक्रमादरम्यान दररोज दोन भाग्यवान महिलांची निवड महाराजांच्या हस्ते चिठ्ठीद्वारे करण्यात आली. अशा प्रकारे सोळा महिलांना मोफत देवदर्शन ट्रिपची संधी मिळाली. यावर्षीच्या यात्रेत महिलांनी अत्यंत श्रद्धा व भक्तिभावाने प्रमुख तीर्थक्षेत्रांना भेट दिली. यामध्ये देवादी देव श्री महादेव शिखर शिंगणापूर, ब्रम्हचैतन्य महाराज गोंदवले, संत बाळूमामा अदमापूर, श्री महालक्ष्मी अंबाबाई मंदिर कोल्हापूर दख्खनचा राजा ज्योतीबा, वाडे रत्नागिरी व श्रीक्षेत्र खंडोबा पाल कराड या पवित्र स्थळांचा समावेश होता. भक्तीभावाने केलेल्या या यात्रेत महिलांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि आनंद विशेष उठून दिसत होते. शांत वातावरणात देवदर्शन घेताना त्यांनी अध्यात्मिक ऊर्जा अनुभवली. या उपक्रमामुळे गावातील भगिनींमध्ये श्रद्धा, एकात्मता आणि अध्यात्मिक जाणीव अधिक दृढ झाली. यावेळी, अशा सेवा संधी पुन्हा पुन्हा लाभत राहो, हीच राजमाता जिजाऊ चरणी प्रार्थना, असे आयोजकांनी सांगितले.



**आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त सिन्नर (त्रिशिल्प) येथे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी राजे उमाजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले समवेत संतोष यशवंत गायधनी आणि सहकारी होते.**

# क्लस्टरस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये बेळगाव पब्लिक स्कूलचे यश

**बेळगाव । रयत समाचार**

बेळगाव ग्रामीण परिसरातील मुतगा व कोंडसकोप येथे झालेल्या क्लस्टरस्तरीय विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये शिंदोळी येथील बेळगाव पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दमदार खेळ करत बहुमोल यश संपादन केले. विविध वयोगटांतील धावणे, उडी, फेक स्पर्धा तसेच सांघिक खेळांत या शाळेच्या मुला-मुलींनी घवघवीत यश मिळवून शाळेचे नाव उज्ज्वल केले.



१४ वर्षाखालील मुलांचा गट (वरिष्ठ प्राथमिक विभाग): गणेश हराजीने १०० मी. व २०० मी. धावण्यात प्रथम क्रमांक पटकावला. समर्थ गुरुजी २०० मी. धावणे व उंच उडीमध्ये द्वितीय, आदित्य वडगावी ४०० मी. धावणे द्वितीय, बसवराज कुरंगी ६०० मी. धावणे तृतीय ठरले. अरिहंत कंगलगौडा व साई तोरली यांनी गोळा फेक स्पर्धेत द्वितीय स्थान मिळवले तर साई तोरली थाळीफेक तृतीय झाला. निखिल मेणसेने ८० मी. अडथळा शर्यतीत द्वितीय क्रमांक मिळवला. सांघिक ४१०० मी. रिलेमध्ये शाळेला द्वितीय क्रमांक मिळाला. १४ वर्षाखालील मुलींचा गट: प्राप्ती अलगोंडा १०० मी. धावणे तृतीय, तनुषा शिरमोजी २०० मी. धावणे प्रथम, समीक्षा कोंडसकोप ६०० मी. धावणे तृतीय ठरल्या. अवनी मुतगेकरने थाळीफेक प्रथम तर श्रुती दौलतकरने थाळीफेक द्वितीय क्रमांक पटकावला. सांघिक हॉलीबॉलमध्ये मुलींनी प्रथम स्थान मिळवले. १७ वर्षाखालील मुलांचा गट (हायस्कूल विभाग): कार्तिक होसुर २०० मी. धावणे द्वितीय, रुद्राक्ष कुरंगी १५०० मी. धावणे द्वितीय, महेश कुरंगी लांब उडी द्वितीय क्रमांकावर राहिले. सांघिक ४१०० मी. रिले व हॉलीबॉलमध्ये संघाला द्वितीय क्रमांक मिळाला. १७ वर्षाखालील मुलींचा गट: मानवी कोंडसकोप हिने १०० मी. व ८० मी. अडथळा शर्यतीत तृतीय स्थान पटकावले. चैतन्य कन्नुकरने २०० मी. धावणे, गोळा फेक व थाळीफेक मध्ये द्वितीय स्थान मिळवले. धनश्री देसाई ४०० मी. धावणे प्रथम व ८० मी. अडथळा शर्यत द्वितीय ठरली. सुमलता गद्दी गोळा फेक तृतीय, अनुश्री खनगांवकर लांब उडी व तिहेरी उडी द्वितीय झाली. सांघिक ४१०० मी. धावणे व हॉलीबॉलमध्ये मुलींना द्वितीय क्रमांक मिळाला. या यशाबद्दल बेळगाव पब्लिक स्कूलचे अध्यक्ष डॉ. शिवकुमार रेवशेट्टी, मुख्याध्यापिका राजश्री, उपमुख्याध्यापिका श्रीदेवी सी. व्ही., प्रशासक सुनील हिरेमठ, शारीरिक शिक्षक शट्टू पाटील, आदर्श गडद्दवर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# शांतता टिकविण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या धर्माचे पालन करावे- डॉ.तांबे

## मानवता संदेश फाउंडेशनतर्फे पैगंबर जयंतीनिमित्त ग्रंथ वितरण

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

देशातील प्रत्येक नागरिकाने आपल्या धर्मानुसार आचरण केल्यास शांतता व एकोपा टिकून राहील. भूतदया व करुणा ही सर्व धर्मांची खरी शिकवण असून कुठलाही धर्म दुसऱ्याचा द्वेष करायला शिकवत नाही. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या धर्मसंस्थापकांच्या शिकवणुकीचे पालन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले. मानवता संदेश फाउंडेशन व जिल्हा उर्दू साहित्य परिषद आयोजित ग्रंथवितरण कार्यक्रम शासकीय विश्रामगृहात झाला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधीज्ञ भागचंद चुडीवाल होते. व्यासपीठावर आमदार हेमंत ओगले, माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे, मंजुश्री मुरकुटे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंत जोशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक राम शिखरे, बाळासाहेब देशमुख, गटशिक्षणाधिकारी साईलता सामलेटी, लकी सेठी, रणजीत श्रीगोड, पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक गाडेकर व महेश रक्ताटे, संपादक करण नवले, हाजी अंजुमभाई शेख, मुख्तारभाई शहा, रईस जहागीरदार, आदिनाथ जोशी, अशोक उपाध्ये, डॉ. निशिकांत चव्हाण, मारूतराव राशिनकर आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. तांबे म्हणाले की, आज स्वार्थासाठी काही जण समाजात द्वेष पसरवत आहेत. अशा वेळी समाजातील सर्व घटकांनी संविधानिक जीवनपद्धतीचा संदेश द्यावा व जातीय कटुता कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत. आमदार हेमंत ओगले यांनी शांततेशिवाय विकास शक्य नसल्याचे सांगून मानवता संदेश फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले. प्रारंभी अध्यक्ष सलीमखान पठाण यांनी प्रास्ताविक केले. मनोगत अध्यक्ष चुडीवाल, अनुराधा आदिक, मंजुश्री मुरकुटे, करण ससाणे, अनंत जोशी व शहर काजी सय्यद अकबरअली यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन समीन बागवान तर आभार अशोक उपाध्ये यांनी मानले. कार्यक्रमाला माजी प्राचार्य टी. ई. शेळके, डॉ. बाबुराव उपाध्ये, प्रा. शिवाजी बारगळ, सुकदेव सुकळे, ॲड. शफी शेख, ॲड. कलीम शेख, प्रा. सतीश म्हसे, प्रा. लक्ष्मण कोल्हे, प्रा. ज्ञानेश गवले, राजेंद्र हिवाळे, प्रवीण जमदाडे, लबाजी कोल्हे गुरुजी, के. टी. निंभोरे, जीवन सुरुडे, मारुती राशिनकर, बद्रीनारायण वढणे, प्रदीप आहेर, अनिल पांडे, महेश माळवे, सचिन उघडे, नितीन चित्ते, लालमोहम्मद जागीरदार, मिलिंदकुमार साळवे, देविदास देसाई, चंद्रकांत झुरंगे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी व सर्वधर्मीय मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नजीरभाई शेख, खालिद मोमीन, तन्वीर शेख, डॉ. सलीम शेख, रवि त्रिभुवन, डॉ. अफराज तांबोळी, फिरोज पठाण, मोहम्मद बदर शेख, फय्याज पठाण, बबलू काझी, हारुण अब्दुल्लाह, मुदस्सर शेख, अरबाज पठाण, शाहबाज सय्यद, जुनेद जागीरदार, शोएब पठाण, रेहान पठाण आदींनी परिश्रम घेतले.

**मानवता संदेश फाउंडेशन आयोजित या कार्यक्रमाला शहरातील सर्व राजकीय पक्षांचे प्रमुख पुढारी आपले राजकीय मतभेद विसरून उपस्थित होते. ऐन निवडणुकीच्या काळात सुद्धा सर्वजण आपले पक्षीय मतभेद विसरून एकत्र आले याबद्दल उपस्थितांनी कौतुक केले.**

# पैगंबर जयंती खर्च कमी करून पूरग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन

**अहमदनगर । आबीद खान**



देशाच्या विविध राज्यांमध्ये पूर आणि नैसर्गिक आपत्तीमुळे हजारो कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेशसह अनेक राज्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले असून मोठ्या प्रमाणावर लोक बेघर झाले आहेत. या पार्श्वभूमीवर पैगंबर जयंती उत्सव साध्या पद्धतीने साजरा करून त्यावरील खर्च वाचवून तो निधी आपत्तीग्रस्त बांधवांच्या मदतीस द्यावा, असे भावनिक आवाहन अहमदनगर सोशल फाउंडेशन ट्रस्टचे प्रमुख नईम सरदार यांनी केले आहे. नईम सरदार म्हणाले की, ''इस्लाम धर्मातील खरी शिकवण म्हणजे गरजूंना मदत करणे. पैगंबर मोहम्मद यांनी सदैव मानवतेचा मार्ग दाखविला आहे. आज देशातील हजारो कुटुंबे संकटात आहेत. अशा वेळी पैगंबर जयंतीत होणारा अनावश्यक खर्च टाळून तोच पैसा त्यांच्या मदतीसाठी खर्च करणे हेच पैगंबरांचे खरे संदेश पालन ठरेल.'' ते पुढे म्हणाले की, पैगंबर जयंती आनंदाने साजरी करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, पण त्याचबरोबर समाजातील आणि देशातील संकटग्रस्त लोकांना मदत करणे हीही आपली धार्मिक व सामाजिक जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत प्रत्येकाने आपापल्या परीने हातभार लावला पाहिजे. अहमदनगर सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या माध्यमातूनही लवकरच पूरग्रस्तांना मदत पोहोचविण्यासाठी विशेष मोहिम हाती घेण्यात येणार असल्याचेही नईम सरदार यांनी स्पष्ट केले.




# रामचंद्र महाराजांमुळे श्रीरामपूरचा एकोपा टिकून आहे- ससाणे

## श्रीराम तरुण मंडळातर्फे श्री विसर्जन मिरवणुकीचे स्वागत

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

शहराचे पहिले नगराध्यक्ष कै. रामचंद्र महाराज उपाध्ये यांनी सर्व जाती-धर्मातील नागरिकांना सोबत घेऊन जातीय सलोखा टिकविण्याचे कार्य केले. रामनवमी व उर्स एकत्र साजरे करण्याची परंपरा सुरू केली आणि सर्वांना मान-सन्मान दिला. त्यांचे कार्य श्रीराम तरुण मंडळ आजही करीत आहे, याचा आनंद असल्याचे प्रतिपादन माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे यांनी केले. मेन रोडवरील श्रीराम तरुण मंडळातर्फे श्री विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्याची परंपरा गेल्या १७ वर्षांपासून सुरु असून यावर्षीही कायम ठेवण्यात आली. राममंदिर चौकात आयोजित कार्यक्रमात ससाणे बोलत होते. कार्यक्रमास माजी आमदार भानुदास मुरकुटे, मंडळाचे संस्थापक अशोक उपाध्ये, अध्यक्ष सुरेश सोनवणे, कार्याध्यक्ष राजेंद्र सोनवणे, मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष गौतम उपाध्ये, सिद्धार्थ मुरकुटे, अहमदभाई जहागीरदार, रवी पाटील, लकी सेठी, रज्जाक पठाण, मुन्ना पठाण, मुक्तार शाह, आशिष धनवटे आदी मान्यवर उपस्थित होते. मिरवणुकीत सहभागी सर्व श्रीगणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्हे देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत करून मंडळाचे कौतुक केले. कार्यक्रमास संजय जोशी, वैशाली जोशी, योगेश ओझा, राजेंद्र उंडे, राजेंद्र लचके, आयाज तांबोळी, संजय पांडे, ईसाक पटेल, अतुल उपाध्ये, बाळासाहेब उपाध्ये, अभिजीत भावसार, जयराम उपाध्ये, बाळासाहेब खाबिया, दिलावर पेंटर, भैय्या आतार, सिकंदर पठाण आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक संघाचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल डीडी काचोळे विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील जाधव यांचा यावेळी मंडळातर्फे विशेष सत्कार करण्यात आला. शेवटी राजेंद्र सोनवणे यांनी आभार मानले.

# पुष्कर परदेशीचे कुस्ती क्षेत्रात विजयी पाऊल



**वाशिम । रयत समाचार**

कुस्तीच्या आखाड्यात घडलेले असंख्य पैलवान आपले नाव गाजवत असताना, बोल्हेगाव येथील पुष्कर यशवंत परदेशी याने वाशिम येथे झालेल्या शालेय कुस्ती स्पर्धेत १६ वर्षांखालील वयोगटात ८० किलो वजन श्रेणीत बाजी मारत विजेतेपद पटकावले. या घवघवीत यशामुळे बोल्हेगावच्या मातीचा लौकिक उंचावला आहे. धानोरकर विद्यालय, जिल्हा वाशिमचा विद्यार्थी असलेला पुष्कर सध्या पुण्यातील अमोल बुचुडे रेस्लिंग अकॅडमीमध्ये कुस्तीचे कसून धडे घेत आहे. घरात पिढ्यान् पिढ्या कुस्तीचे वातावरण असल्यामुळे लहानपणापासूनच त्याला या खेळाची गोडी लागली. त्याच्या घराण्याचा गावासाठी असलेला ठेवा विशेष मानला जातो. बोल्हेगावचे संस्थापक पै. किसनसिंग गोविंदसिंग परदेशी यांचा तो पणतू असून, पै. यशवंत जयसिंग परदेशी यांचा सुपुत्र आहे. परदेशी घराण्याने गावासाठी केलेले योगदान आजवर लक्षणीय राहिले आहे. गाव वसवण्यापासून तालीम उभारून तरुणांना पैलवान होण्यासाठी घडवण्यापर्यंत हे घराने कधीही मागे हटले नाही. आजच्या काळातही गावातील मुलांनी कुस्तीक्षेत्रात चमकावे, नाव मिळवावे यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात. त्याचा परिणाम म्हणूनच पुष्कर सारखे तरुण खेळाडू आघाडीवर येताना दिसत आहेत. या विजयानंतर पुष्कर चे नातेवाईक आणि गावात आनंदाचे वातावरण असून गावकऱ्यांच्या वतीने मा. नगरसेवक कुमारसिंह वाकळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन पुष्करचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोल्हेगाव स्पोर्ट्स क्लब चे अध्यक्ष भाऊ कापडे उपस्थित होते. वाकळे यांनी कौतुकाची थाप देत, ''असेच गावाचे नाव अधिक उज्ज्वल कर,'' अशा शब्दात शुभेच्छांचा वर्षाव केला.यावेळी मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. पुष्करच्या यशामुळे बोल्हेगावच्या कुस्ती परंपरेला नवी झळाळी मिळाली असून, पुढे तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील गावचा झेंडा उंचावेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# शारदा विद्या निकेतन येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती उत्साहात साजरी

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

भारताचे माजी राष्ट्रपती व तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती श्रीगोंदा येथील शारदा विद्या निकेतनच्या मुरलीधर होनराव माध्यमिक विद्यालय व एन. एस. गुळवे ज्युनिअर कॉलेजमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव डॉ. अशोक खेंडके यांच्या हस्ते डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाले. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे श्रीगोंदा तालुका अध्यक्ष पिटर रणसिंग, सचिव राम सोनवणे, शिक्षक नेते व मुख्याध्यापक सुनील भोर, शिक्षक संघटनेचे श्रीगोंदा तालुका अध्यक्ष देवराम दरेकर, मुख्याध्यापिका संगिता वनपुरे, कॉलेज विभाग प्रमुख प्रा. कांचन कुरुमकर, डॉ. नानासाहेब कुरुमकर, विजयराजे काटे, शरद महाराज वाबळे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त होऊन नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत चर्चा झाली. नुकतीच अहिल्यानगर येथे झालेल्या शिक्षण उपसंचालक स्तरावरील सुनावणीच्या अनुषंगाने हा विषय मांडण्यात आला. चर्चेदरम्यान पुणे विभागाचे आमदार जयंत आसगावकर, मराठवाडा विभागाचे आमदार विक्रम काळे, कोकण विभागाचे आमदार ज्ञानेश्वर (माऊली) म्हात्रे, नाशिक विभागाचे आमदार किशोर दराडे, तसेच मुख्याध्यापक महामंडळाचे उपाध्यक्ष सचिन नलावडे यांच्याशी दूरध्वनीद्वारे संवाद साधण्यात आला. सुनामी समितीकडून शासन व उच्च न्यायालयास सकारात्मक म्हणणे सादर करण्यासाठी राज्यातील सर्व विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पदवीधर आमदार यांच्या सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे यावेळी प्रतिपादन करण्यात आले. या चर्चेत श्रीगोंदा तालुका मुख्याध्यापक संघाचे सचिव व १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जुनी पेन्शन योजनेसाठी समन्वयक सुनील भोर, तालुका अध्यक्ष बी. टी. मखरे, देवराम दरेकर, देविदास खेडकर, सतीश गांजुरे यांनी सहभाग नोंदविला.

# जपानी भाषा परीक्षेत विखे महाविद्यालयाचे यश



**अहमदनगर । विजय मते**

विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, अहमदनगर हे केवळ तांत्रिक शिक्षणापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत आहे. या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, महाविद्यालयातील आठ विद्यार्थ्यांनी ५ स्तराच्या जपानी भाषा प्राविण्य परीक्षेत यश संपादन केले आहे. जपान सरकारतर्फे जुलै २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या या आंतरराष्ट्रीय परीक्षेत उत्तीर्ण होऊन विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे: वैष्णवी कदम, अक्षदा तांबे, नेहा शिरसाठ (तृतीय वर्ष माहिती तंत्रज्ञान), विद्या तांबे, तृप्ती जाधव (तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी), सोनाली गुंड, कल्याणी कोल्हे (अंतिम वर्ष इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार), कल्याणी दरेकर (पदव्युत्तर नागरी अभियांत्रिकी). या यशामागे महाविद्यालयातील जपानी भाषा उत्कृष्टता केंद्राचे मोलाचे योगदान आहे. विशेषतः संचालिका पूजा वैकर यांनी विद्यार्थ्यांना दिलेले सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि प्रोत्साहन, तसेच प्रा. वैदेही पारनाईक यांनी घेतलेल्या अथक मेहनतीमुळे विद्यार्थी जपानी भाषेत पारंगत झाले. लेखन, वाचन व संभाषण या तिन्ही अंगांनी दिलेल्या प्रशिक्षणाचा परीक्षेत मोठा फायदा झाला. या यशामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, संशोधन आणि आंतरराष्ट्रीय रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विशेषतः जपानमधील औद्योगिक क्षेत्रात करिअर घडविण्याच्या दृष्टीने ही भाषा उपयुक्त ठरणार आहे. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर, विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे टेक्निकल डायरेक्टर प्रा. सुनिल कल्हापुरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच फाउंडेशनचे डायरेक्टर जनरल डॉ. पी. एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक










**हॉटेल भाड्याने देणे**

नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.

- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# मेलडी क्वीन आशा

गेली सात दशके आपल्या स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि असंख्य संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या जेष्ठ अष्टपैलू गायिका, मेलडी क्वीन आशा भोसले यांचा आज वाढदिवस. आशाताईंचा आज ९२ वा वाढदिवस आहे असे सांगितले तर कोणाचा विश्वासही बसणार नाही. कारण आपल्या आवाजाप्रमाणे कायम चिरतरुण असणाऱ्या आशाताईंमध्ये आजही वीस वर्षाच्या तरुणीला मागे पाडेल एवढी ऊर्जा आहे. वयाच्या ९२ व्या वर्षीही त्यांच्यात गाण्याची, स्वर उंचावण्याची क्षमता एवढी आहे की आजही त्यांच्या आसपास कोणतीही गायिका फिरू शकत नाही. आपल्या सात दशकांच्या संगीत कारकिर्दीत त्यांना भारतरत्न सोडता सर्वच पुरस्कार मिळाले. दोन वर्षापूर्वी २४ मार्च २०२३ रोजी आशाताईंना प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने महाराष्ट्र सरकारतर्फे गौरविण्यात आल्याने संगीत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला होता. यावेळी तेव्हाचे उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर तसेच भारतरत्न सचिन तेंडुलकर उपस्थित होते. आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. आशा भोसले यांनी गेली सत्तर वर्ष संगीत कलेची जी सेवा केली आहे त्याचीच पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार. ८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताईंना संगीताचे बाळकडू त्यांच्या घरातच मिळाले. १९४३ साली माझा बाळ या चित्रपटात दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या चला चला नव बाळा... या गाण्याने आशाताईंनी चित्रपट गायनाला प्रारंभ केला. वयाच्या पंधराव्या वर्षीच म्हणजे १९४८ साली हंसराज बहल यांच्या चुनरिया या चित्रपटात सावन आया हे गाणे गाऊन त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. १९५३ साली बिमल रॉय यांनी त्यांना आपल्या परिणिता या चित्रपटातील गाणी गाण्याची संधी दिली. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५४ साली राज कपूर यांनी बूट पॉलिश या चित्रपटात मोहम्मद रफी यांच्यासोबत नन्हे मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी मे क्या है गायला दिले. १९५६ साली सीआयडी हा चित्रपट आला या चित्रपटातील त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. १९५७ साली आलेल्या नया दौर या चित्रपटातील गाणी तर खूपच लोकप्रिय झाली आणि सर्वत्र आशाताईंचे नाव झाले. आशाताई हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीची गायिका म्हणून नावारूपास आल्या. त्या काळातील सर्वच संगीतकारांची गाणी त्यांनी गायली. मागील सत्तर वर्षात असा एकही संगीतकार नसेल ज्यांनी आशाताईंना आपल्यासाठी गाण्याची विनंती केली नसेल. १९४८ पासून सुरू झालेला आशाताईंच्या संगीत कलेचा प्रवास आजही अखंडपणे सुरू आहे. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तामिळ, मल्याळम, इंग्रजी, रशियन अशा विविध भाषेत सोळा हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. त्यांनी एक हजारांहून अधिक चित्रपटासाठी गायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीतील गायनासाठी त्यांना सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार तर दोनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २००० साली त्यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने तर २००८ साली मानाच्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. २०११ साली सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्वविक्रम त्यांनी केला. त्यांच्या या विश्वविक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. आशा भोसले यांनी सर्वप्रकारची गाणी गायली आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीवर सुरवातीच्या काळात लता मंगेशकर यांचा वरचष्मा होता. तेंव्हा दुसऱ्या गायिकांना संधी मिळणे अवघड होते हे ओळखून त्यांनी वेगळा मार्ग पत्करला. ज्या प्रकारची गाणी लता मंगेशकर गायच्या त्या प्रकारची गाणी सोडून अन्य प्रकारची गाणी त्यांनी गायला सुरुवात केली. यात पॉप तसेच पाश्चिमात्य सुरावट असलेल्या गाण्यांचा समावेश होता. त्या गाण्यांनी युवकांवर मोहिनी घातली. त्यांनी गायलेले गझल, मुजरे आणि भजनेही लोकप्रिय झाली. संगीतातला कुठलाही प्रकार त्यांनी गायचा सोडला नाही. आशा भोसले यांनी अनेक भाषेत गाणी गायली असली तरी त्यांनी मराठीत सर्वाधिक गाणी गायली आहेत ते स्वाभाविकही आहे त्यांचे बंधू हृदयनाथ मंगेशकर यांच्यासाठी त्यांनी अनेक गाणी गायली आहेत. मलमली तारुण्य माझे, तरुण आहे रात्र अजूनी, मी मज हरपून बसले ग ही त्यांची गाणी इतकी लोकप्रिय आहेत की अजूनही ती स्मरणात आहे. कुठल्याही कार्यक्रमात ही गाणी अजूनही म्हटली जातात. त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली आहेत. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या आशाताई म्हणजे आधुनिक काळातील एक आश्चर्य आहे. आशाताईंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!





**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

## हिवरे बाजारला
## जलसमृद्ध गाव पुरस्कार



**नगर तालुका । रयत समाचार**

नुकताच पंचायतराज मंत्रालय भारत सरकारच्या वतीने शाश्वत विकास ध्येयाचे स्थानिकीकरण कार्यक्रमात पंचायत विकास निर्देशांक व राष्ट्रीय पंचायत पुरस्कार सन २०२२-२३ आधारित जिल्हास्तर जलसमृद्ध गाव प्रथम पुरस्कार हिवरेबाजारला मिळाला. राज्यशासनाच्या ग्रामविकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि ग्रामीण भागातील विकासाला गती देण्यासाठी ''मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'' या महत्वाकांक्षी उपक्रमाची अंमलबजावणी सुरू केली आहे. याप्रसंगी विधानपरिषदेचे अध्यक्ष मा.ना. रामजी शिंदे साहेब, आदर्शगाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री डॉ. पोपटरावजी पवार साहेब, आमदार श्री.काशिनाथजी दाते सर, आमदार श्री. विठ्ठलरावजी लंघे, आमदार श्री. विक्रमजी पाचपुते, यशदा चे उपमहासंचालक श्री. मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आनंदजी भंडारी, जि.प. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजयजी मुळीक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हिवरे बाजार गावाने पाण्याच्या ताळेबंदावर आधारित पिक पद्धतीचा अवलंब तसेच गुणवत्तापूर्ण जलसंधारण कामामुळे हा पुरस्कार मिळाला असून पुरस्काराचे स्वरूप प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह असे होते. पुरस्कार स्वीकारताना हिवरे बाजारचे सरपंच विमलताई ठाणगे,चेअरमन छबुराव ठाणगे,व्हा चेअरमन रामभाऊ चत्तर,एस.टी.पादीर, मुंबादेवी दुधडेअरी चेअरमन बाबासाहेब गुंजाळ,सहदेव पवार,राजू सहादू ठाणगे,राजू पवार,श्रीपत फलके ग्रामविकास अधिकारी, गुलाब गायकवाड व ग्रामस्थ उपस्थित होते.

## स्किपर लिमिटेड
# प्रगतीशील स्मॉलकॅप कंपनी

स्किपर लिमिटेडची स्थापना १९८१ साली स्किपर इन्व्हेस्टमेंट लिमिटेड म्हणून झाली. त्यानंतर १९९० मध्ये कंपनीचे नामांतर होऊन स्किपर स्टील लिमिटेड झाले. आज ही कंपनी भारतातील एक प्रख्यात मॅन्युफॅक्चरिंग आणि इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी म्हणून कार्यरत आहे. कंपनीचे मुख्यालय पश्चिम बंगालच्या कोलकाता येथे असून संजय कुमार बंसल हे मुख्य प्रवर्तक आहेत. व्यवसाय क्षेत्र व जागतिक उपस्थिती स्किपर लिमिटेड ही भारतातील सर्वात मोठ्या ट्रान्समिशन आणि डिस्ट्रीब्युशन (T&D) स्ट्रक्चर निर्मात्यांपैकी एक आहे. जागतिक स्तरावर या क्षेत्रातील पहिल्या १० कंपन्यांमध्ये स्किपरचा समावेश होतो. कंपनीचा एक्सपोर्ट व्यवसाय ६५ पेक्षा अधिक देशांमध्ये पसरलेला आहे. यात दक्षिण अमेरिका, युरोप, आफ्रिका, मिडल ईस्ट, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आशिया यांचा समावेश आहे. ट्रान्समिशन टॉवर निर्मितीव्यतिरिक्त कंपनी या उत्पादनांमध्येही सक्रिय आहे. पीव्हीसी आणि यूपीव्हीसी पाईप्स. वॉटर टाक्या व बाथरूम फिटिंग. पोल्स, मोनोपोल्स. रेल्वे स्ट्रक्चर्स आदी. पश्चिम बंगाल आणि आसाम येथील ४ युनिट्सच्या माध्यमातून कंपनीकडे ३.७५ लाख MTPA इतकी उत्पादन क्षमता आहे. त्यामुळे ७६५ KV / ८६० KV क्षमतेचे प्रकल्प तसेच मोठ्या प्रमाणावर निर्यात हाताळण्याची क्षमता कंपनीकडे आहे. आर्थिक स्थिती : मार्केट कॅपिटलायझेशन : ₹६५३० कोटी. आर्थिक मालमत्ता (Assets) : ₹११६० कोटी. ऑर्डर बुक (FY२६ Q१ पर्यंत) : ₹८५२० कोटी (कंपनीच्या मार्केट कॅपपेक्षा जास्त मूल्याची) सेल्स ग्रोथ (FY२६ Q१) : मागील वर्षाच्या तुलनेत १५% वाढ. कंपनीची मागणी हाताळण्याची क्षमता स्पष्ट दिसते. नेट प्रॉफिट (FY२६ Q१) : मागील तिमाहीच्या तुलनेत ४१% वाढ. नफा : ₹४४७ कोटी. ही वाढ कंपनीच्या सक्षम व्यवस्थापन आणि योग्य व्यावसायिक निर्णयामुळे झाली आहे.

**महत्त्वाचे आर्थिक गुणोत्तर (Ratios)**

मार्केट कॅपिटलायझेशन : ₹६४१६ कोटी.
रिटर्न ऑन कॅपिटल (ROCE) : २४.४%.
प्रति शेअर उत्पन्न (EPS) : ₹३.९६
पी/ई गुणोत्तर : (P/E RATIO) ४०.४

वार्षिक निकाल (FY २५) : विक्री (Sales) : ₹४६२४ कोटी (+४१% YoY) निव्वळ नफा ( Net Profit) : ₹१५० कोटी (+८३% YoY) मागील दोन वर्षांत विक्रीत २.५ पट वाढ आणि नफ्यात ४ पट वाढ गुंतवणूकदारांचा विश्वास : विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (FII) आपला हिस्सा ५.४२% पर्यंत वाढवला आहे. देशांतर्गत वित्तीय संस्था आणि म्युच्युअल फंड्सनीदेखील गुंतवणूक वाढवली आहे. ही गोष्ट कंपनीवरील विश्वास व भविष्यातील वाढीची क्षमता दर्शविते.

गुंतवणुकीसाठी मार्गदर्शन : कंपनीची आर्थिक स्थिती, मजबूत ऑर्डर बुक, विक्री व नफ्यातील वाढ आणि संस्थात्मक गुंतवणूकदारांचा विश्वास पाहता, भारतीय गुंतवणूकदारांनी ₹५४० ते ₹५८० या किंमत श्रेणीत स्किपर लिमिटेडचे शेअर्स खरेदी करावेत. सहा महिन्यांच्या अवधित याचे लक्ष्य ₹७३० पर्यंत ठेवता येईल.



**ऋषीकेश आगरकर**
९६७३९२५११५

**अर्थवार्ता**

HRUSHIKESH BL AAGARKAR'S
कोटीभास्कर
SIP | Mutual Fund
Share Market
Real Estate & Developers
Hrushikesh BL Aagarkar
9673925115
B.Com., MBA Finance
Technical Analyst (National Stock Exchange Certified)
Investment Consultant (AMFI Certified)
agarkar.hrishi@gmail.com

# कराल ते हित सत्य करा, कोणाही जीवाचा न घडो मत्सर

पाटील हे पदनाम प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. मात्र रयतप्रतिपालक शिवाजी महाराजांच्या काळात या पदाला अधिक महत्व प्राप्त झाले. ''पट्टकील'' या शब्दावरून ''पाटील'' हा शब्द आला. ज्याचा अर्थ जाड कापडाच्या पट्टीवर (पट्टा) नोंदी ठेवणारा आणि गावचा प्रमुख असा होतो. ''पट्टकील'' हा शब्द मुळात संस्कृत भाषेतील ''पट्टकील'' (पट्टा + कील) या शब्दाचा अपभ्रंश आहे. ज्याचा अर्थ पट्टा किंवा जाड कापडाची पट्टी आणि कील म्हणजे जोडणे किंवा बांधणे . या शब्दाचा संबंध गावप्रमुख किंवा गावकीच्या नोंदी ठेवणाऱ्या वतनदाराशी आहे. ज्यांना पट्ट्यांवर ( कापडाच्या पट्ट्यांवर ) नोंदी ठेवण्याची जबाबदारी असे. कोल्हापूर भागात गेलं की, मराठा समाजातील ९०% आडनावांपुढे पाटील लिहिलेलं दिसेल. मुळात पूर्वी गावाची पाटीलकी ही एका व्यक्तीकडे असायची. शिवकाळ किंवा त्या आधीपासून जरी विचार केला तरी या ''गावप्रमुख पाटील''कीची घर, खानेसुमारी वगैरेनुसार आज पाच-पंचवीस फारतर पन्नास झाली असतील. आणि एकेकाळी यांच्याकडे शे-पाचशे एकर जमीनही असेल तशी पाटीलकी असणाऱ्या सर्व जात समूहाची परिस्थिती जवळपास सारखीच होती. म्हणजे सगळ्या जातसमूहातील पाटील, देशमुखांकडे त्यांच्या त्यांच्या प्रमाणात शे-पाचशे एकर जमिनी होत्या. शिवरायांच्या सैन्यात शेवटचा शिपाई गडीही होता. तो जसा बेरड, रामोशी, कुंभार, लोहार, सुतार होता तसा तो आजचा मराठाही होता. किल्लेदार जसा मराठा होता तसा लोहार, आगरी, कोळी, धनगर, रामोशी, सीकेपी, ब्राम्हण सुद्धा होता. छत्रपतींच्या सैन्यातील मावळ्यांना पगार मिळत होता. शिवराय-शंभुराजेंच्या स्वराज्यात ''वतनदारी नव्हती''. ''वतनदारी नव्हती''. वतनदारी नव्हतीच'' हे पुन्हा पुन्हा मेंदू जाग्यावर ठेवून आधी आपण समजून-उमजूनच पुढे गेलं पाहिजे. ताराराणींच्या काळात काळाची गरज म्हणून स्वराज्यात वतन द्यायला सुरुवात झाली. पण त्यांची संख्या किती असेल? देशमुख म्हणजे परगण्याचा प्रमुख . आज जसे पाटीलकी देशमुखी लावण्याचे पेव फुटले आहे तसे एवढे परगणे आणि एवढे देशमुख नक्कीच नव्हते आणि नाहीत. मराठ्यांमध्ये जसे देशमुख आहेत तसे देशमुख ( परगण्याचा प्रमुख ) मराठ्यांसह प्रदेशानुसार अठरापगड जातीतील बऱ्याच जातसमूहात जसे -मराठा व्यतिरिक्त सीकेपी, धनगर, वाणी, महादेव कोळी या जातीत आणि अन्य जातसमूहात तर वैदिक ब्राम्हण, जैन, लिंगायत, मुस्लिम या आणि या व्यतिरिक्त अन्य धर्मात, धर्मसमूहात सुद्धा देशमुख आडनाव आढळतात तर मराठा, माळी, धनगर, सीकेपी, आगरी, तेली, वाणी या आणि अन्य जातीत आणि जातसमूहात पाटील आडनाव आढळतात तसेच - वैदिक ब्राम्हण, मुस्लिम, जैन, लिंगायत या आणि अन्य धर्म समूहात पूर्वी आणि आजही पाटील पद आणि आडनावांचा उल्लेख आढळतो. म्हणजे याचा सरळसरळ अर्थ असा आहे पाटील आणि देशमुखी ही कोणा एकाची प्रादेशिक मक्तेदारी नव्हती. म्हणून सामाजिक आणि शैक्षणिक प्रतिनिधीत्वाचा विचार करत असताना जे पॅरामिटर किंवा क्रायटेरिया मराठा पाटील आणि देशमुख यांना लावत असताना तेच पॅरामिटर आणि क्रायटेरिया सामाजिक आणि शैक्षणिक प्रतिनिधित्वाचा विचार करत असताना या सगळ्या समकक्ष पद आणि प्रतिष्ठा, आडनाव, पडनाव वापरणाऱ्या जात आणि धर्मांना लावायला हवा तेव्हाच आपण संविधानिक लोकशाही व्यवस्थेत राहतो असे म्हणता येईल. शिवाय ही आडनाव किंवा पद आणि प्रतिष्ठा नसणारी मराठा आणि अन्य अठरापगड जातीतील राहणीमान, खानपान हे समकक्षच आहेत तेव्हा तेच नियम आज मराठा जात समूहाला जसे - कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा या सर्वच जातींना एकाच भूमिकेतून बघितले पाहिजे तरच त्यांच्यासोबत न्याय केल्यासारखे होईल. एकाला एक आणि दुसऱ्याला दुसरा न्याय आणि नियम हे कुठल्याही परिस्थितीत न्यायसंगत आणि नीतीसंगत नाही. त्याचप्रमाणे १८९० च्या आधी आज जसे हिंदू - मराठा, हिंदू - माळी, हिंदू - धनगर, हिंदू - वंजारी, हिंदू - तेली असे उल्लेख टीसी वर येतात तसेच उल्लेख मराठा- कुणबी, मराठा - धनगर, मराठा - माळी असे उल्लेख १८९० आणि त्यापूर्वी आढळत होते . याचा अर्थ मराठा हा शब्द प्रांत सांगत असायचा तर त्यापुढे येणारा माळी, कुणबी, धनगर वगैरे शब्द आपला व्यवसाय आणि जात सांगत होता. तसेच सातारा गॅझेटियर आणि अन्य अनेक गॅझेटियर आणि अन्य अनेक नोंदींमध्ये मराठा म्हणजेच कुणबी असा स्पष्ट उल्लेख आहे . आणि जातीचा अभ्यास करणाऱ्या सगळ्या डोळस लोकांना हे माहिती आहे . त्यांनी ते अभ्यासले आहे तरीही त्यांना सोयीनुसार कधी मराठ्यांना शूद्र ठरवायचे असते तर कधी सवर्ण ठरवायचे असते. असे या बोटावरील थुंकी त्या बोटावर आणि त्या बोटावरील थुंकी या बोटावर करणारे विचारवंत महाराष्ट्रात आज आहे हे या महाराष्ट्राचे दुर्दैव म्हणावे का ? जेव्हा शाहू महाराजांच्या बाबतीत १९०१ -१९०२ च्या सुमारास घडलेले इतिहासप्रसिद्ध वेदोक्त प्रकरणासारखे जळजळीत वास्तव असताना सोयीनुसार भूमिका घेणाऱ्यांना काय म्हणावे ? याचा एक माणूस म्हणून आपण विचार करा. मुळात शिवकाळातील पाटील, देशमुख यांची संख्या किती असेल? आणि आजची त्यांची संख्या किती असेल? पाटील व्यतिरिक्त आजचे मराठा आहेत ते सर्वच्या सर्व पाटील, देशमुख नक्कीच नाहीत. विदर्भातील माजी मंत्री अनिल देशमुख स्वतः सरंजामदार असूनही मराठा आरक्षणाला विरोध करतात, डॉ. आशिष देशमुख सुनील केदार या तत्सम ( पाटील/ देशमुख ) इत्यादींची भूमिका सुद्धा तीच आहे. विदर्भासह इतरत्र असणारे देशमुख आणि पाटील ज्यांच्या कित्येक पिढ्यांनी स्वतःच्या गढ्या आणि वाडे सांभाळलेत त्यांनी त्या सामाजिक प्रतिष्ठेच्या गढ्या आणि वाडे सोडून विरोध करावा. भूमिका घ्याव्यात. पण त्याचवेळी आपल्या अंतःमनात आणि अंतःगृहात सुद्धा डोकावून बघावे.

बबनराव तायवाडे सारखे सरंजामदार शिक्षणसम्राट पाटील समाजाची पाटीलकी सोडून मैदानात कधी येतील? बबनराव तायवाडे सारखे संस्थाचालक शिक्षण सम्राट आपली तथाकथित पाटीलकी वाचविण्यासाठी कुणबी-मराठा वाद लावून मोकळे होतात. मुळात त्यांनी एक सांगावे त्यांनी महात्मा जोतीराव फुले साहेबांनी सांगितलेली शेतकरी संकल्पना अभ्यासली आहे का? का फक्त मत्सरापोटी पोटात किल्मिश आणि पित्त घेऊन ते जगत आहेत? त्यांना एवढा कुठला राग आहे की, मराठवाड्यातील आणि इतरत्र मराठ्यांचे नातेसंबंध त्यांना मान्य नाहीत? ते ज्या पूर्व विदर्भात राहतात तिथे ते ज्या जातसमूहातून येतात तेथील पोटजातीत आजही मोकळ्या पणाने विवाह होतात का? याबद्दल त्यांनी स्पष्टपणे बोलावे ? मग इथे ज्यांचे पिढ्यान पिढ्यांचे नातेसंबंध आहेत त्यांच्याबद्दलच आपल्याला आक्षेप आहेत. त्याचे कारण काय? मुळात मराठ्यांसह इतर सर्वच अठरापगड जाती या एवढ्या जातीवादी ( जातींमध्ये लग्न करणारे ) आहेत जातीयवादी असे नव्हे. की त्या आजही जातीशिवाय इतरत्र लग्न करत नाहीत . अरेंज मॅरेजच करतात . म्हणजेच नातेवाईक आणि जातीतच लग्न करतात. मग त्यांना मराठा या जनगणमन मधील मराठा हा शब्द प्रदेशवाचक आहे एवढाही मेंदू असू नये ? हे अवघड जागेच दुखन म्हणायचं की, कळूनही न कळलेला धंदेवाईक शहाणपणा म्हणायचा? सहकार सम्राट राधाकृष्ण विखे पाटील आपले आडनाव ओबीसीत ठेवताना इतर गरीब समाजाला डब्याबाहेर का फेकतात? विखे पाटील यांचे सन्मित्र डॉ. रावसाहेब कसबे हे मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष होते. डॉ. रावसाहेब कसबे यांची ख्याती जातवर्गस्त्रीदास्यांताचे अभ्यासक अशी सांगितली जाते. मार्क्सच्या माध्यमातून त्यांना वर्गांत हवाय आणि माफुआ किंवा तत्सम त्यांच्या वैयक्तिक विचारसाधनेतून त्यांना जात्यंताकडे जायचे आहे . परंतु असे असताना एका जात्यंतक संशोधकाने आणि अभ्यासकाने कसे वागावे ? त्यांची नेणिव कशी असायला हवी ? पण ते सुद्धा मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष असताना एका भाषणात बोलून गेले की, मराठा आरक्षणात त्यांनी ''खुट्टा मारून'' ठेवला. ही खुट्टा मारून ठेवण्याची जात नेणिव या तथाकथित साठी बुद्धी नाठी झालेल्या जात्यंतक संशोधकामध्ये कुठून निर्माण आणि विकसित झाली? हा खरा जात्यंतक संशोधनाचा विषय झालाय? मागासवर्ग आयोगासारखे महत्वाचे पद आणि जबाबदारी असताना डॉ. रावसाहेब कसबे यांच्यासारख्या मानवमुक्तीची भाषा करणाऱ्या, त्यासाठी मोठ्या भिंगाचा चष्मा वापरून जाडीभरडी पुस्तके लिहिणाऱ्या शेवटी असे तत्वज्ञानाचे डोज पाजणाऱ्या या तथाकथित मानवमुक्तीच्या वाटसरूची जात नेणिव आणि जाणीव देखील करप्ट म्हणजे भ्रष्ट आणि पूर्णतः बरबटलेलीच राहिली हेच निःसंशय सिद्ध होते. शिवाय असे बोलून त्यांनी खरेतर आपल्या कामात प्रेजुडाईज वागल्याबद्दल आणि कार्यात कसूर केल्याचा स्वतःच ढळढळीत पुरावा सोडल्याबद्दल त्यांना शिक्षा व्हायला हवी. पण सोयीस्कर जात्यंतवादी असणाऱ्या या तथाकथित संशोधकाला शिक्षा कोण आणि कशी देणार? हा खरा प्रश्न आहे. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, कोंकणमधील सर्व जातीतील पाटील, देशमुख, इनामदार, जहागीरदार, चौगुले, चौधरी, अशा पदव्या लावणाऱ्यांनी त्या पदव्या भिरकावून मग आरक्षणावर बोलावे? आपले असले-नसलेले वाडे, गाडे, गढ्या सोडून-फोडून कृती करावी आणि मग व्यक्त व्हावे. आजच्या टीसीवरच्या मराठ्यांमधील पाटीलकी/देशमुखी असणारे २ % - ४% टक्के लोकांच्या संख्येसाठी इतरांना जमीनदार, सरंजामदार सारखी विशेषणे खरतर त्या गटात टाकून आपण कुठला सत्यशोधक धर्म पाळतो आहोत? हाच नियम सुरुवातीला जात्यंताची प्रधान भूमिका घेऊन वाटचाल करणाऱ्या कॉ. सचिन माळी यांना सुद्धा लागू आहे. त्यांनी एकदा जात्यंताची भूमिका घेतलेले सूप वाजवल्यानंतर जात्यंतक क्रांतिकारकरांच्या भाषेत जाती घट्ट करणारे फेडरेशन उभे करणारे संस्थापक फाउंडर मेम्बर वगैरे बनण्याची जातसरंजामी बुद्धी त्यांच्यात कुठून बळावली? या वृत्तीचा विकास त्यांच्यात कुठून झाला? हे एकदा त्यांना स्पष्टच करावे लागेल. त्याच्यातून त्यांची किंवा अन्य कोणाचीही सुटका नाही. अशीच भाषा करणारे प्रा. लक्ष्मण माने यांना तर थेट महामानवांच्या नातवासमोर सांस्कृतिक समता आणि स्वातंत्र्याचा संगम म्हणवणाऱ्या थोर अशा फुलेवाड्यावर पाटलीन नाचवावी वाटावी, तशी भाषा करावी वाटावी यासारखे दिवाळखोर बुद्धीचे लक्षण कुठले म्हणावे? जातवर्गस्त्रीदास्यांताची प्रधान भूमिका घेणाऱ्या तत्कालीन जात्यंतक क्रांतीकारकांना या गोष्टीवर फिदीफिदी हसावं वाटावं आणि टाळ्या वाजवाव्या वाटाव्यात यासारखी स्त्रीदास्यमानसिकता दुसरी कुठली म्हणावी? का तुम्हाला स्त्रीच का नाचवावी वाटली? चीड आणि राग व्यक्त करण्यासाठी पुरुष का नाचवावा वाटला नाही? कारण जात्यंतक क्रांतिकारक म्हणवणाऱ्या आणि सोयीनुसार जातप्रवर्गाचे फेडरेशन उभारणाऱ्या तुम्हा सर्व लोकांच्या नेणिवेत आणि खरतर जाणिवेत सुद्धा स्त्रीदास्यमानसिकता अजूनही जिवंत आहे. हे सोयीनुसार जात्यंताचा डंका वाजवणाऱ्या खोट्या आणि लबाडांना आज ना उद्या कबूल करावेच लागेल. यातून तुमची सुटका नाही. त्यामुळेच आजपर्यंत तुम्हाला उपराकार लक्ष्मण मानेंच्या स्त्रीदास्यमानसिकतेचा साधा निषेधही करावा तेव्हाही वाटला नाही. आणि आजही वाटत नाही. कारण तुमच्यातील जात्यंतक हा केवळ डफावर थाप हाणून धंदेवाईक गाणे म्हणणाऱ्यांसारखा आहे. फक्त टाळ्या घेण्यासाठी आणि सुपारीचे सूप वाजविण्यासाठी तुमच्या आरोळीमागे फक्त धनाचा साठा, वाटा आहे. मानवमुक्तीची, स्त्रीदास्यमुक्तीची कुठलीच साद आणि भूमिका तुमच्याकडे नाही. सुपाऱ्या घेणे आणि त्या वाजवणे, टाळ्या घेणे हे तर देशातील प्रत्येक धंदेवाईक गाणे म्हणणारा करत असतोच मग तुमच्यात आणि त्यांच्यात फरक तो काय? आपण कुठला-कुठला मानवतावाद मानतो आहोत? आणि कुठल्या-कुठल्या जात्यंताकडे जात आहोत? केवळ आपला डब्बा सुरक्षित करण्यासाठी आपल्याकडे असणाऱ्या कौशल्याचा, कलेचा आणि लेखनाचा वापर अशा कावेबाजपणासाठी आपण करत असाल तर आपण सुद्धा पुरोगामीत्वाच्या कुंपणाआड लपलेली नवसरंजामदार मानसिकता बाळगणारे धंदेवाईक सरडे आहात हे आतातरी मान्य करा. किंवा असे आपणांस का म्हणू नये? याचे स्पष्ट उत्तर किंवा भूमिका आपल्याकडे आहे का? शेवटी सगळ्यांना प्रामाणिकपणे एवढंच सांगायचं आहे की, ''एखाद्याचा नैसर्गिक आणि संविधानिक हक्क नाकारणे हे मानवताविरोधी आणि संविधानविरोधी सुद्धा आहे''. भलेही मग तुम्ही स्वतःला कितीही बुद्ध, चार्वाक, शिव, मार्क्स, फुले, शाहू, आंबेडकर यांचा वारसा सांगत फिरत का असेना. न्यायाधीशांनी सुद्धा न्याय करतेवेळी कुठल्याही प्रिजुडाईज भूमिकेत न राहता, निदान न्याय करतेवेळेस तरी आपल्यातील न्यायाधीश आणि त्याचे कार्य एवढेच डोक्यात ठेवून, दोन्ही बाजू नीट ऐकून, अभ्यासून विवेकाने निर्णय घ्यावा. तुमचा निर्णय हा कुठल्याही राजकीय, सांस्कृतिक संघटनांनी, किंवा पक्षाच्या विचारधारा वगैरेंनी प्रभावित नसावा. कारण तुमचा एक चुकीचा किंवा प्रिजुडाईज दृष्टिकोन समाजमनावर खोल परिणाम करत असतो हे कायम ध्यानात ठेवावे. पीठासीन असताना पूर्णकाळ तुम्ही कुठल्याही व्यवस्थेचे प्रवक्ते नसता तर पवित्र अशा न्यायपीठाचे उत्तराधिकारी असता म्हणून केवळ आणि केवळ त्या भूमिकेत असताना त्याच भूमिकेतून योग्य-अयोग्य तपासून निर्णय करावा. म्हणूनच तुकोबारायांच्या भाषेत प्रामाणिकपणे सांगावस वाटते - कराल ते हित सत्य कराकोणाही जीवाचा न घडो मत्सर वर्म सर्वेश्वर पुजनाचे.



**अॅड. निरज धुमाळ**
८७६७३४७१२२

**प्रासंगिक**

**या लेखाचा प्रतिवाद करायचा असेल किंवा या लेखाला आव्हान द्यायचे असेल तर ते दैनिक रयत समाचारमध्ये प्रसिद्धीसाठी पाठवु शकता. मी आपल्या भूमिकेचे नक्कीच स्वागत करेल. - अॅड. धुमाळ**

*(लेखक आम्ही सारे भारतीय संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आहेत)*